**प्रसिध्दी पत्रक** **दिनांक : ०४/०६/२०२५**

**तहसिल कार्यालय किनवट येथील महिला तलाठी भाग्यश्री तेलंगे व सुजाता गवळे यांनी शेती नावावर करण्यासाठी १६,०००/—रूपयांची लाचेची मागणी करुन लाच स्विकारली म्हणुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड यांचे जाळ्यात**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट** |
| पोलीस ठाणे | किनवट जि. नांदेड |
| गुन्हा रजिस्टर नंबर | गु.र.नं १६९/२०२५ कलम ७,७ अ, १२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| गुन्हा दाखल दिनांक व वेळ | दिनांक ०३/०६/२०२६ रोजी २२.५२ वाजता |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव, हुद्दा व पत्ता | १) भाग्यश्री भीमराव तेलंगे, वय ३४ वर्षे, पद तलाठी, सज्जा निचपूर ,ता. किनवट, जिल्हा नांदेड<br>२) सुजाता शंकर गवळे वय २५ वर्षे, पद तलाठी, सज्जा कणकवाडी, ता. किनवट, जिल्हा नांदेड |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १७०००/— रूपये |
| लाच स्विकारली रक्कम | १६०००/— रुपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे वडिलोपार्जित ७ एकर शेत आहे. त्यापैकी अर्धी शेती साडे तीन एकर तक्रारदार यांचे पत्नीचे नावावर करण्यासाठी तलाठी कार्यालयात अर्ज दाखल केला होता. तक्रारदार त्यांचे कामाचे अनुषंगाने तलाठी तेलंगे यांना भेटले असता, त्यांनी प्रथम चाळीस हजार रुपये व तडजोडी अंती १७०००/— रूपये लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार दि.२९/०५/२०२५ रोजी प्राप्त झाली होती.<br>दिनांक ०३/०६/२०२५ रोजी पंचासमक्ष लाचमागणी पडताळणी केली असता, यातील तक्रारदार लोकसेविका तलाठी तेलंगे व तलाठी गवळी यांना भेटले. तलाठी तेलंगे यांनी तक्रारदार यांना तलाठी गवले यांना भेटा असे सांगून त्यांच्या कडे पाठविले.तेव्हा तलाठी गवले यांनी तक्रारदार यांची फाईल घेऊन तलाठी तेलंगे यांना दाखवून त्यांना बोलून परत आले व तेलंगे मॅडम ज्याप्रमाणे सांगतात त्याप्रमाणे करा असे म्हणाल्या त्यानंतर तक्रारदार यांनी तलाठी तेलंगे यांना कामाचे विचारले असता, तेव्हा तलाठी तेलंगे म्हणाले की त्यादिवशी सांगितले, त्यापेक्षा ३ हजार कमी केले. त्यावेळी तक्रारदार त्यादिवशी सतरा हजार म्हणले होते असे बोलले, तेव्हा तलाठी तेलंगे यांनी तलाठी गवले यांची समक्ष अठरा हजार रुपये असे म्हणाल्या. तेव्हा तक्रारदार यांनी आता अठरा हजार आणू की सोळा हजार असे म्हणाले. तेव्हा तलाठी तेलंगे यांनी सोळा हजार असे म्हणून स्वत: साठी व तलाठी गवले यांच्या साठी लाचेची मागणी करून लाच स्वीकारताना मिळून आले आहेत.<br>दिनांक ०३/०६/२०२५, दिनांक लाच स्वीकृती सापळा कार्यवाही आजमावली असता, तक्रारदार यांच्या कडून लोकसेविका तलाठी तेलंगे आणि गवळी यांनी लाचेची रक्कम १६०००/— रुपये स्वीकारताना रंगेहात मिळून आले आहेत.<br>दोन्ही महिला आलोसे यांना ताब्यात घेण्यात आले असुन पोलीस ठाणे किनवट येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे |
| मार्गदर्शक | श्री. संदीप पालवे, पोलीस अधीक्षक, डॉ. संजय तुंगार अपर पोलीस अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परीक्षेत्र नांदेड |
| पर्यवेक्षक अधिकारी | श्री. प्रशांत पवार, पोलीस उप अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड |
| गुन्हयाचा तपास | श्री. प्रशांत पवार, पोलीस उप अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.


| | |
|---|---|
| **संपर्क पत्ता :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, नागार्जुनसागर बिल्डील स्नेहनगर/श्रीनगर नांदेड** | |
| **संपर्क कमांक :— 02462—253512**<br>**टोल फ्री कमांक— 1064** | **ऑनलाईन तकार ॲप्लीकेशन** acbmaharashtra.net |
| **मा. पोलीस अधीक्षक 9359056840** | **पोलीस उपअधीक्षक 9359056840** |
| **ई—मेल आयडी**<br>spacbnanded@mahapolice.gov.in | **ई—मेल आयडी**<br>dyspacbnanded@mahapolice.gov.in |
| **FACEBOOK – Dysp Acb Nanded** | **TWITTER - @ACBnanded** |
| **INSTAGRAM – acb_nanded** | |


पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड